साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष १३ वे, अंक - पहिला; एप्रिल-मे-जून २०२२

UGC Care Listed Journal
ISSN 2231 - 573X

● संपादक ●
डॉ. शिवाजी हुसे

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड,
कन्नड, जि. औरंगाबाद – ४३११०३, मो. ९९०४००३९९८

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | छत्रपती शिवाजी महाराजांचा उद्योग व व्यापारासंदर्भातील दृष्टिकोन<br>- डॉ. मीना वडगुळे | १ - ३ |
| २. | छ. शिवाजी महाराजांचे अमात्य व जकातविषयक धोरण<br>- डॉ. सुनील अण्णा गोरडे | ४ - ७ |
| ३. | सभासद बखरीतील छत्रपती शिवाजी महाराज<br>- डॉ. रमेश औताडे | ८ - १० |
| ४. | छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन<br>- प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे | ११ - १३ |
| ५. | छत्रपती शिवाजी महाराजांचे बांधकाम व राजस्व धोरण : एक चिकित्सक अभ्यास<br>- डॉ. ज्ञानेश्वर जिगे | १४ - १६ |
| ६. | छत्रपती शिवाजी महाराजांचा सामाजिक दृष्टिकोन<br>- डॉ. सतीश मस्के | १७ - २० |
| ७. | श्री छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी कविता<br>- डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत | २१ - २४ |
| ८. | शिवकालीन समाजव्यवस्थेचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>- प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | २५ - २९ |
| ९. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर<br>- प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर | ३० - ३४ |
| १०. | न्यायप्रिय राजा : छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य<br>- प्रा. डॉ. दादासाहेब गिऱ्हे | ३५ - ३७ |
| ११. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर<br>- प्रा. डॉ. वाल्मीक शंकर आढावे | ३८ - ४१ |
| १२. | शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- प्रा. योगेश गुलाबराव भदाणे | ४२ - ४४ |
| १३. | छत्रपती शिवाजी महाराज व्यक्तित्व आणि कार्य<br>- डॉ. विठ्ठल केदारी | ४५ - ४८ |
| १४. | छत्रपती शिवाजी महाराजांची आरमारविषयक भूमिका<br>- डॉ. भूषण गोविंद फडतरे | ४९ - ५४ |
| १५. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. पालवे रामनाथ सूर्यभान | ५५ - ५८ |



# छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर

**- प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर**
मराठी विभागप्रमुख
को.ए.सो. लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय
पेझारी, ता. अलिबाग, जि. रायगड

बखर हा ऐतिहासिक साहित्यातील एक महत्त्वाचा प्रकार असून तो दक्षिण आशियातील विशेषकरून मराठी साहित्यातील आहे. ऐतिहासिक घडामोडी, शूर, वीरांचे गुणगान, लढाया थोर पुरुषांची चरित्रे याविषयीचे लेखन बखरीत वाचावयास मिळते. आतापर्यंत २०० बखरी लिहिल्या गेल्या असतील असा अंदाज आहे. मध्ययुगीन इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी अतिशय उपयुक्त व उत्कृष्ट असे परिणामकारक साधन म्हणजे बखर वाङ्मय होय. बखर वाङ्मय लेखनाची सुरुवात शिवकाळात झाली व पेशवाईच्या अखेरीस बखर वाङ्मयास उतरती कळा लागली. मराठ्यांचा इतिहास सांगणारे बखर वाङ्मय हे ऐतिहासिकदृष्ट्या अधिक प्रमाणित मानले जाते. बखर वाङ्मयामध्ये मराठ्यांचा इतिहास शब्दबद्ध करण्यात आला असला तरी काही अंशी त्यात बखरकारांनी अनेक ठिकाणी अतिशयोक्तीपूर्ण वर्णन केले असल्याचे निदर्शनास येते. असे असले तरी मराठ्यांचा इतिहास खऱ्याअर्थाने जाणून घेण्यासाठी शास्त्रशुद्ध साधन म्हणून बखर वाङ्मयाकडे पाहिले जाते.

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात स्वराज्याची स्थापना झाली आणि मराठी भाषेला राजभाषेचे स्वरूप प्राप्त झाले. पराक्रमाचे पोवाडे जसे कवितेतून गायले जाऊ लागले तसेच कर्तृत्ववान आणि आदर्श राज्यकर्त्यांचे, त्यांच्या कर्तृत्वाचे, कारकीर्दीचे दर्शन मराठी गद्यातूनही घडू लागले. मराठी गद्याचा हा शिवकालीन अवतार जितका कलात्मक तितकाच तो तेजस्वी होता. कौटुंबिक आणि राष्ट्रीय भावनेने भारलेला होता. राजकीय पार्श्वभूमीवर विविध व्यक्तींच्या जीवनातील उग्र, भीषण तसेच करुणामय असे दर्शन घडविणारा होता. या सर्व वैशिष्ट्यांच्या मुळाशी होती विलक्षण भाबडी बालबोध अशी पक्षनिष्ठा, आत्मीयता आणि स्वकीयांचा अभिमान. या काळातील गद्यग्रंथ मुख्यतः बखरवजा असून त्यातून स्वराज्याचे दर्शन घडते.

मराठी गद्य सारस्वताच्या इतिहासातील बखर वाङ्मयाचे स्थान महत्त्वपूर्ण असे आहे. या बखरीचा अभ्यास केवळ ऐतिहासिकदृष्ट्या म्हणून करण्याऐवजी मराठेशाहीतील गद्य सारस्वतांचा एक नमुना म्हणून केला, तर वाङ्मयीन सौंदर्याचे भलेमोठे भांडार आपणासमोर खुले होते. शाहिरी कवितेप्रमाणेच इतिहासासोबत तत्कालीन तेजस्वी सांस्कृतिक जीवनाचा आरसा जतन करण्याचे श्रेय बखरीस दिले पाहिजे, म्हणून बखर ग्रंथांना 'मराठेशाहीच्या तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप' असे म्हटले गेले आहे.

**बखर शब्दाची व्युत्पत्ती -**

'बखर' हा शब्द मूळ 'खबर' (वार्ता, समाचार, वृत्त) या अरबी शब्दाचा विपर्यास होऊन बखर शब्दाची निर्मिती झाली आहे. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते बक = बकणे, बोलणे या धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली. याचा अर्थ पूर्वीच्या काळी बखरी लिहिण्याऐवजी तोंडाने बोलल्या जात असाव्यात, असा तर्क करणे भाग पडते. बखर या शब्दाचा रूढ अर्थ राजकीय स्वरूपाचे ऐतिहासिक लेखन असा आहे. त्यामुळे गद्यात लिहिलेला 'ऐतिहय वृत्तांत' अशी बखरीची ओळख करून देता येईल. मुसलमानांमध्ये तवारिखा लिहिण्याची पद्धत होती म्हणून मुसलमानाच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहून मराठ्यांनी बखरी लिहिण्याचा प्रघात पडला असे वि. का. राजवाडे म्हणतात. ऐतिहय वृत्तकथनाच्या गरजेतून मराठी बखर वाङ्मयाची निर्मिती झाली. पूर्वी भाट लोक मोठमोठ्या वीर पुरुषांच्या बखरी तोंडाने बोलत असत. त्यावरून बखर हा शब्द प्रथमतः तोंडी इतिहासाला लावू लागले आणि नंतर लेखी इतिहासालाही तो शब्द लावण्यात आला. (वि. का. राजवाडे लेखसंग्रह भाग-३) याप्रमाणे बखर या शब्दाची व्युत्पत्ती 'खबर' (फारसी) आणि भख (संस्कृत)

अशा दोन्ही शब्दांपासून सांगता येते. या दोन्ही शब्दांचे मूळ एकच असण्याची शक्यता आहे. मराठ्यांच्या इतिहासातील निरनिराळ्या घटना प्रसंगावर जवळजवळ दोनशे ते अडीचशे बखरी लिहिल्या गेल्याचे वि. का. राजवाडे सांगतात. तरी उपलब्ध व त्यातही लक्षात घेण्याजोग्या बखरी फक्त ५० च्या जवळपास जातात. रचना काळाच्या दृष्टीने 'महिकावतीची बखर' ही सर्वात जुनी बखर मानली जाते.

समकालीन बखरकाराने समक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या राजकीय घटनाप्रसंगावर आधारित बखरी या प्रकारच्या बखरीत समकालीन राजकारणाचा इतिहास असतो. ऐतिहासिक घटना डोळ्यापुढे घडल्याप्रमाणे बखरकार सारी माहिती सांगत असल्यामुळे ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने या बखरी बऱ्याचशा विश्वसनीय ठरतात. उदा. 'सभासद बखर' या प्रकारात मोडते.

ऐतिहासिक कागदपत्रे, जुने ग्रंथ, दप्तरातील टिपणे, यांच्या आधारे लिहिलेल्या उत्तरकालीन बखरी. ऐतिहासिक आधार घेऊन या बखरी लिहिलेल्या असल्यामुळे त्या उत्तरकालीन असल्या तरी ऐतिहासिक सत्याच्या दृष्टीने बऱ्याचशा विश्वसनीय असतात. उदा. मल्हार रामराव चिटणीसविरचित 'सप्त प्रकरणात्मक चरित्र' या सदरात मोडते.

बहुतेक शिवकालीन बखरीचे लेखन गद्यातूनच झालेले आढळते. गद्यपद्यमिश्रित अशी 'महिकावतीची बखर' हाच काय तो एक अपवाद. गद्यात्मक मजकूर व त्यापेक्षा अधिक निश्चित स्वरूपाचा असल्याने बखरकारांनी ते गद्यात्मक माध्यम बखर लेखनासाठी निवडले असावे. कोणातरी पुरुषांच्या आज्ञेनुसार या बखरींचे लेखन झाले. बहुतेक बखरकार हे सरकार दरबारचे आश्रित किंवा कारकुनी पेशातील असल्याकारणाने बखर लेखनाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. इतर सर्व वाङ्मयप्रकारांपेक्षा बखर रचनेचे स्वरूप बरेचसे वेगळे आहे. बखरीचा प्रारंभ असतो पुराण पद्धतीचा आणि शेवट असतो फलश्रुतिमय. सृष्टीची उत्पत्ती, राजांच्या वंशावळी इत्यादी गोष्टी बखरीच्या देऊन नंतर तो वृत्तकथन करतो. पुराण ग्रंथांचे वाचन धार्मिकता व श्रद्धात्मकता यांचा पगडा आणि बालबोध वळण या बखरकारावरील संस्कारांतून बखरीचे हे वैशिष्ट्यपूर्ण स्वरूप जन्माला आले आहे.

**शिवकालीन बखरी -**

शिवपूर्वकालापेक्षा शिवकालात लिहिल्या गेलेल्या बखरींची संख्या बरीच अधिक आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे या कालखंडातील थोर युगप्रवर्तक विभूती. त्यामुळे त्यांचे जीवन आणि चरित्र हा अनेक लेखकांच्या लेखनाचा विषय बनावा हे अगदी स्वाभाविक होते. या काळातील एकूण बखरींपैकी जवळजवळ निम्म्या बखरी शिवचरित्रवर्णनपर आहेत. त्यापैकी 'सभासदाची बखर' ही समकालीन बखर असून बाकीच्या शिवचरित्रवर्णनपर बखरी या उत्तरकालीन आहेत.

**शिवछत्रपतींचे चरित्र / सभासद बखर -**

'सभासद बखर' ही शिवकालीन पहिली बखर समजली जाते. समकालीनाने शिवाजी महाराजांचे लिहिलेले पहिले चरित्र म्हणूनही ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने या बखरीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. लेखक कृष्णाजी अनंत सभासद याने छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज व राजाराम महाराजांच्या काळातही मराठेशाहीची सेवा केली, छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारात विविध पदांवर त्याने काम केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक पाहण्याचे भाग्य त्याला लाभले होते. छत्रपती राजाराम महाराजांसोबत जिंजीला असताना राजाराम महाराजांच्या आज्ञेनुसार इ. स. १६९७ च्या सुमारास सभासदाने शिवाजी महाराजांच्या चरित्रावर बखर लिहून काढली. या बखरीत शिवाजी महाराजांचे सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत सर्व पराक्रमांचे वर्णन केले आहे. ही बखर संक्षिप्त स्वरूपात असली तरी शिवकालीन बखर असल्याने तिला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिवकालातील या बखरीचा विषय छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र हा होय. या बखरीत सुरुवातीला शिवाजीराजेंचे पूर्वज मालोजीराजे, विठोजीराजे, शहाजीराजे यांची हकीगत सांगून छत्रपती शिवाजी महाराजांच्या वृत्तांताचे निवेदन यात केले आहे.

शिवछत्रपतींपासून राजाराम महाराजांच्या अखेरीपर्यंत तो राजदरबारी सभासद होता. यामुळे त्या नावानेच तो ओळखला जातो. शिवाजी महाराजांच्या जीवनातील एकूण ७१ प्रसंगांचे निवेदन कृष्णाजी अनंत सभासद याने येथे केले असून बहुतेक महत्त्वाच्या घटना या बखरीत बखरकाराने वर्णन केलेल्या आहेत. त्यामुळे हे चरित्र ऐतिहासिकदृष्ट्या संपूर्ण नसले तरी छत्रपती शिवाजी महाराजांसंबंधी बहुतेक महत्त्वाच्या घटना यात आलेल्या आहेत. या बखरीत कालनिर्देश नसला तरी बखरकाराने घटनांचा क्रम शेवटपर्यंत पाळला आहे. घटनांचे विस्तृत वर्णन, तसेच अठरा कारखाने, खजिना,

शिलेदार, सुभेदार, सरदार, कारकून, हुजरे, जंजिरे, गड-कोट इत्यादींच्या जमाखर्चाचा तपशील ही या बखरीची वैशिष्ट्ये आहेत. अद्भुत प्रसंगांचे वर्णन, यथार्थ व्यक्तीदर्शन, आकर्षक वस्तूवर्णन, घटनांची चित्तवेधक मांडणी अशी या बखरीची वाङ्मयीन वैशिष्ट्ये सांगता येतात. प्रसंगाचे कथन करताना अनुकूल वातावरणनिर्मिती केलेली दिसते. चरित्राची लेखनशैली साधी असूनही प्रसन्न आहे. लेखनात भाषेचा सैलपणा आढळत नाही. पाल्हाळ टाळून लहानसहान वाक्यांत व्यक्तींचे नेमके वर्णन करण्याचे बखरकाराचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.

स्वराज्य संस्थापकाचे मराठीतले पहिले समकालीन चरित्र म्हणून ऐतिहासिकदृष्ट्या ही बखर जितकी महत्त्वाची तितकीच साहित्यगुणसंपन्नतेने मराठी वाङ्मयाच्या इतिहासात अढळ स्थान मिळालेली अशी आहे. नाट्यपूर्ण प्रसंगाचे चित्रमय वर्णन हे पुढे इतर बखरींत आढळणारे वैशिष्ट्य याही बखरीत आढळते. प्रसंगातील नाट्य शब्दरूप करण्याचे कौशल्य त्यासाठी छोट्या छोट्या; पण समर्पक वाक्यरचनेचा आश्रय, यामुळे या बखरीतील प्रसंगनिर्मिती यशस्वी ठरली आहे. संस्कृत आणि फारसीप्रचुर शब्दयोजना आणि ओघवती भाषा यामुळे मात्र हे चरित्र वाचनीय झाले आहे.

**चित्रगुप्तविरचित शिवाजी महाराजांची बखर -**

ही बखर स्वतंत्र नसून सभासद बखरीचा तो अनुवाद आहे. रघूनाथ यादव चित्रे यांनी प्रस्तुत बखर इ. स. १७६० ते १७७० यादरम्यान रचली आहे. सभासद बखरीतील सारे प्रसंग घेऊन काही घटना फक्त मुळात व्यक्तींची नावे संपूर्ण नसलेली यादी दिली आहे. तरी काही घटना स्वकल्पनेने अधिक भावपूर्ण केल्या आहेत. क्वचित ठिकाणी सईबाईंची भेट, शिवाजी-रामदास यांचा संबंध यासारखे मुळात नसलेले प्रसंग अंतर्भूत करून शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकला आहे. हरदासी हाताने लिहिलेल्या या बखरीत पौराणिक दाखले दिले आहेत, तसेच पौराणिक थाटाचे वर्णन केले आहे. अफझलखान - शिवाजी भेट आणि शिवराज्याभिषेक या दोन प्रसंगांचे वर्णन सभासद बखरीपेक्षा चित्रगुप्ताने अधिक विस्तृत आणि डौलदार भाषेत केले आहे. शिवाजीराजांचे वर्णन करताना रघूनाथ यादव चित्रे म्हणतात -

'तैसे हृदयस्थान प्रशस्त, बाहू-दंड गजसुंडपनप्राय व कटी
सिंहाकृती तैसेच करपल्लव पंकजपुष्पासमान',

अशी अलंकृत भाषा ते वापरतात. भाषा संस्कृतप्रचुर असून त्यात शब्दाचे अवडंबर आहे. फारसी, उर्दूचाही उपयोग बखरकाराने केला आहे. उदा. औरंगजेब शिवाजीराजांच्या संदर्भात म्हणतो, 'केवळ सैतान, बड़े करामत का, घड़ी में बिल्ली और बाघ होता है, और पचास पचास हात जोरसे कूदता है' अधूनमधून संस्कृत-मराठी व हिंदुस्थानी लोक व पदे रचून निवेदन आकर्षक करण्यात आले आहे. उदा. अफझलखानाला भेटायला शिवाजी महाराज निघतात त्याप्रसंगी जिजाबाई महाराजांना आशीर्वाद देताना म्हणतात, 'कुंतीचे सुत भीम-अर्जुन जैसे ऐसाचि तू भूतळी बापा आर्यन शिखा मनीच अससि तू भोसल्यांचे कुळी वेगे कौतुक दाखवी समरी मारूनिया अफझलला राज्याची अभिवृद्धी पूर्ण करणे आशीर्वाद माझा तुला.' अफझलखान शिवाजीराजे यांचा संवाद त्याने हिंदुस्तानी पद्यात दिला आहे.

बखरीचा शेवटही पौराणिक थाटाला साजेसाच आहे. 'हे पुण्यश्लोक शिवाजी महाराज छत्रपती जनेश्वर यांचे चरित्र जो कोणी भक्तीने श्रवण करील त्यास कोणती फलश्रुती होईल' हेही बखरकार आवर्जून नमूद करतो. घटनांचे प्रत्ययकारी वर्णन, शिवाजी महाराज आदींचे प्रभावी व्यक्तिचित्रण, हरिदासी पद्धतीचे नाट्यात्म निवेदन अशा लेखनगुणांनी युक्त असलेल्या या बखरीने चरित्रात्मक बखर वाङ्मयात वैशिष्ट्यपूर्ण भर घातली आहे. ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीनेही ही बखर विश्वसनीय समजली जाते.

**श्री छत्रपतींची ९१ कलमी बखर - दत्तो त्रिमल वाकेनवीस**

श्री शिवछत्रपतींची ९१ कलमी बखर आणि भोसले घराण्याची चरितावली दत्ताजी त्रिमल वाकेनवीस यांनी इ. स. १७०१ ते १७०६ या काळात ही बखर लिहिली. फारसी तवारिखा वाचून बखर लिहिली, अशी प्रेरणा लेखकाने नोंदविली आहे. या बखरीला तो आख्यान म्हणतो. यात ९० प्रकरणे आहेत. 'पुण्यश्लोक राजांची कथा' लेखकाने स्वप्रेरणेने लिहिली आहे. अफझलखान वध प्रसंग, आग्र्याहून सुटका इत्यादी महाराजांच्या जीवनातील प्रसंग त्रोटक स्वरूपात आले आहेत. राज्याभिषेकाचेही वर्णन मोजक्याच शब्दात येते. जुनी सभासदपूर्व बखर म्हणून निश्चितच मोल आहे. बखरकार शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधानातील एक मंत्री वाकेनिशी बखर या नावानेही ती ओळखली जाते. कलमवार लेखन, आटोपशीरपणा हे या बखरीचे वैशिष्ट्य मानले जाते. या चरित्रात्मक बखरीचा कर्ता म्हणून दत्ताजी त्रिमल वाकेनवीस

याच्याबरोबर येथे अनाजी रंगनाथ मलकरे यांचे नाव इतिहाससंशोधक घेत असले तरी तिचा मूळ कर्ता वाकेनवीस हाच होय.

इतर शिवचरित्रात्मक बखरींप्रमाणे या चरित्रात्मक बखरीचे लेखन कोणाच्या तरी आज्ञेने झाले आहे असे दिसत नाही. फारसी तवारिखा वाचून आपणही शिवचरित्र लेखन करावे असे वाटल्यावरून बखरकाराने सदरहू आख्यान ९० प्रकरणे पुण्यश्लोक राजा त्याची कथा... तपशीलवार लिहिली. चरित्रनायकाला पुण्यश्लोक म्हटले असले तरी 'त्याच्या कार्याला उदात्त स्वरूप देण्याचा व अद्भुत चमत्कारांच्या ठायी ठायी अवलंब करण्याचा मार्ग त्यांनी अवलंबिलेला नाही.

सदरहू बखरीला आख्यान असे बखरकार म्हणत असला तरी घटना, व्यक्ती यांची रसभरीत वर्णने तो करीत नाही. क्रमवार घटना तो नमूद करतो. त्यामुळे अफजलखान वध, आग्र्याहून सुटका यासारखे प्रसंगही त्रोटक आढळतात. 'त्या उपर देवमूर्ती गागाभट वाराणसीकर येऊन रायेगडी राजेस्वामीस मुंजीबंधन पटा - अभिषेक सिंहासनारूढ झाले. छत्रपती जाले शके १५९६ (इ. स. १६७४) आनंद नाम संवत्सरे चैत्र शुद्ध प्रतिपदा शुक्रवार अशा मोजक्या शब्दांत तो राज्याभिषेकाचा प्रसंग वर्णन करतो.

शिवाजीराजे आग्र्यास आणि पुढे हैदराबादी गेले असता वाकेनवीस स्वतः शिवाजी महाराजांसोबत होता. त्यावेळी दैनंदिनी लेखनाची जबाबदारी त्याच्यावर होती. एका समकालीन आणि शिवाजीराजांच्या सहवासात राहिलेल्या एका माहितगार आणि जबाबदार व्यक्तीने लिहिलेली ही बखर ऐतिहासिक प्रामाण्यदृष्टीने महत्त्वाची मानली जाते.

**शिवछत्रपतींचे सप्त प्रकरण आत्मचरित्र - मल्हार रामराव चिटणीस -**

मल्हार रामराव चिटणीस यांनी प्रस्तुत चरित्र श्रीराजाधिराज श्रीमहाराज प्रतापी शाहू नृप छत्रपती यांच्या आज्ञेवरून इ. स. १८१० मध्ये लिहिले. या बखरीत १) पूर्वजन्म वर्णन व जन्मकथन, २) राज्य आक्रमण, ३) सज्जन सेवन, ४) पितृदर्शन, ५) दिल्लीपती पराभव, ६) दक्षिण दिग्विजय, ७) राज्याभिषेक अशी सात प्रकरणे आहेत.

चरित्रनायक हा जणू एक अवतारच आहे, अशी चरित्रकाराची भावना आहे. त्यामुळे त्याच्या चरित्रलेखनाला माहात्म्यपुराणांचे रूप आले आहे. विष्णुपुराण आदी पुराणे रजपुतांच्या राजावळी आणि यवनांच्या तवारिखा यातील वंशावळीच्या आधारे चरित्रलेखकाने शिवाजीराजांचा वंश रजपुतांच्या ३६ कुळातील असल्याचे सांगून त्यांचा संबंध थेट युधिष्ठिरापर्यंत जोडला आहे आणि चरित्रनायकाला सामान्य कोटीतून असामान्य कोटीत नेऊन बसवले आहे. शिवाजी महाराजांच्या या पराक्रम गाथेतील शिवाजी-अफझलखान भेट, अफझलखानाचा वध, शाहिस्तेखान प्रकरण, भागानगरच्या दरबारातील राजांचे चातुर्य, दिल्लीश्वराच्या कैदेतून शिताफीने करून घेतलेली सुटका, दक्षिण दिग्विजय, राज्याभिषेक यांसारख्या रोमहर्षक घटनांबरोबरच जाधवरावांची रंगपंचमी, मालोजीराजेंना झालेला देवीचा दृष्टांत आदी घटनांची वर्णने सरस उतरली आहेत. शिवाय महाराजांच्या प्रभावळीतील व शत्रूपक्षातील व्यक्ती व त्यांच्याविषयीच्या प्रसंगाचे चित्रण प्रभावी झाले आहे.

धर्मस्थापनेचे कंकण बांधलेल्या या चरित्रनायकाचा श्रद्धाभाव संत तुकाराम यांच्याबरोबरच्या त्यांच्या भेटींमधून अधोरेखित करण्यात आला आहे. संत तुकारामांचे कीर्तन ऐकण्यासाठी केवळ दोन हुजऱ्यानिशी जाणे व पठाणांचा वेढा असतानाही विचलित न होणे. हे प्रसंग हृदयस्पर्शी आहेत. पुत्र, पती, पिता म्हणून शिवछत्रपतींची वैशिष्ट्ये तसेच त्यांची सांसारिक सुख-दुःखे चरित्र लेखकाने नीटपणे सांगितली आहेत. संभाजी महाराजांचे मुघलांना जाऊन मिळणे आणि अनुताप होऊन परत येणे, यामुळे राजांचे लक्ष पैलतीरी लागते. 'संभाजी दगा पावेल, राजारामच बळावून पुन्हा राज्य रक्षील' असे भविष्य वर्तवून राज्यकारभाराची निरवानिरव करतात. अंतकाळ जवळ आल्याचे जाणवताच श्रीगंगोदक स्नान प्रायश्चित्तविधी, भस्मधारण, रुद्राक्ष तुळशीमाला धारण करून राजे दर्भासनी बसतात व श्रीराम ऐसे म्हणून देहत्याग करतात आणि इथेच चरित्र संपते.

कारकुनी वळणाची साधी भाषा, छोटी-छोटी वाक्ये, मांडीला मांडी लावून बसलेले संस्कृत व फारसी शब्द, अलंकारिक कथा या भाषासौंदर्यासोबतच चित्रमयता आणि नाट्य आत्मकथा यांच्या समन्वयातून घडलेले मनोज्ञ निवेदन या वैशिष्ट्यांमुळे ही बखर आकर्षक व प्रत्ययकारी झाली आहे. राजदरबाराचा अनुभव आणि बहुश्रुतता या गुणांनी त्यात मोलाची भर घातली आहे. निवेदनातील संयम, उदात्तता हा मल्हार रामराव याच्या लेखणीचा भाव त्याच्या मुळाशी आहे. शिवरायांबद्दलच्या श्रद्धेने भारलेल्या मल्हार रामराव यांच्या व्यक्तिमत्त्वाचेही दर्शन या बखरीतून घडते.

रवींद्रनाथ टागोर यांनी १९०५-१९०६ च्या दरम्यान शिवाजी उत्सव नावाची कविता लिहिली होती. त्यात वर्णन करताना त्यांनी शिवाजी महाराजांब द्दल, 'हे राज तपस्वी वीरा। तुझी ती उदात्त भावना भरून राहिली असंख्य भांडारातून। त्यातला एक कणदेखील काळाला नष्ट करता येणार नाही।' असे म्हटले आहे. रवींद्रनाथांच्या मते शिवाजी महाराजांनी, 'तुकडे झालेला भारत एका धर्मात बांधला' म्हणून शिवाजी उत्सव करणे गरजेचे आहे.

तर कवी कुसुमाग्रज यांनी लिहिले. कुसुमाग्रजांचा जन्म दिनांक २७ फेब्रुवारी १९१२ रोजी झाला. त्यांचा जन्मदिन आजही मराठी भाषा दिन म्हणून ओळखला जातो. कुसुमाग्रज यांचे मूळ नाव गजानन रंगनाथ शिरवाडकर होते. त्यांना दत्तक घेतल्यामुळे कुसुमाग्रजांचे नाव विष्णू वामन शिरवाडकर हे झाले. त्यांनी लिहिलेल्या मराठ्यांची कीर्ती काव्यरूपात या कवितेत खालीलप्रमाणे दिसते. समर भूमीचे सनदी मालक शत युद्धाचे मानकरी । रणफंदीची जात अमुची कोण आम्हा भयभित करी।

याच काळात डॉ. माधव त्र्यंबक पटवर्धन ऊर्फ माधव ज्युलियन यांनी आपल्या 'शिवप्रताप काव्यात' शिवाजी महाराजांबद्दल खालील प्रमाणे गौरवोदगार काढले आहेत - भवानी आमची आउ। शिवाजी आमचा राणा। मराठी आमची बोली। गनीमी हा आमचा बाणा।

वरील काव्यरचनेतून शिवाजी महाराजांबद्दलचा आदरभाव व्यक्त केला आहे. एकूणच आधुनिक कालखंडामध्ये कवी, नाटककार, कादंबरीकार या सर्वांनी शिवाजी महाराजांच्या जीवन प्रवासावर प्रकाश टाकला आहे.

**५) अर्वाचीन कालखंड : इसवी सन २००० ते आजपर्यंत**

आधुनिक कवितेतील वाल्मीकी म्हणून ग. दि. माडगूळकर यांचा उल्लेख केला जातो. ग. दि. माडगूळकरांनी आपल्या काव्यातून असे मांडले आहे की, हे राष्ट्र देवतांचे। हे राष्ट्र प्रेषितांचे। हा चंद्र सूर्य नांदो। स्वातंत्र्य भारताचे। हे राष्ट्र विक्रमाचे। हे राष्ट्र शांततेचे। सत्यार्थ झुंज घ्यावी। या जागत्या प्रथेचे। येथे शिवप्रतापी नरसिंह योग्यतेचे।...

मागील सुमारे चारशे वर्षांच्या कालखंडामध्ये श्री शिव छत्रपती महाराजांवरती कथा, कादंबरी, वैचारिक लेख आणि काव्य या साहित्य प्रकाराद्वारे आजवर लाखो कवी-लेखकांनी लेखन केलेले आहे. सद्यस्थितीत 'शिवाजी महाराजांवरील कविता', 'शिवाजी महाराज शेर मराठी', 'शिवाजी महाराजांवरील शायरी मराठी - २०२१', 'शिवाजी महाराजांच्या चारोळ्या' तसेच 'छत्रपती शिवाजी महाराजांवरील कविता' यासारख्या वेबसाईटमधून कविता पाहायला, वाचायला, ऐकायला मिळतात. आधुनिक गायिका अश्विनी देशपांडे यांनी महाराजांवर पोवाडा रचला आहे. कवी मुबारक शेख यांनी २०१५ मध्ये 'शिवनामा' हा काव्यसंग्रह प्रकाशित केला. या काव्यसंग्रहात त्यांनी निरनिराळे आकृतिबंध वापरून शिवचरित्राची काव्यात्मक मांडणी केलेली आहे.

**निष्कर्ष -**

१) श्री शिवछत्रपती महाराजांचा पाचशे वर्षांपूर्वीचा कालखंड असूनही या विषयावर काव्यरचना आजही होत आहे.
२) श्री शिवछत्रपती महाराज हे या सर्वच कालखंडात कवी साहित्यिकांचे प्रेरणास्थान असलेले पाहायला मिळतात.
३) प्राचीन मराठी काव्यापासून आधुनिक मराठी साहित्यापर्यंत अनेक कवींनी शिवाजी महाराजांवर काव्यरचना केलेल्या पाहायला मिळतात.
४) काव्यरचनेचे प्राचीन, मध्ययुगीन, आधुनिक काव्य प्रकार बदलले असले तरी विषयाची निवड मात्र कालातीत आहे.
५) काव्यरचना, प्रकार आणि जिवंतपणा आजही जशाचा तसाच अनुभवायला मिळतो.

**संदर्भ सूची -**


१) वर्दे, श्रीपाद महादेव, मुंबई मराठी साहित्य संघ, 'मराठी कवितेचा उषःकाल किंवा मराठी शाहीर', द्वितीय आवृत्ती, १९८५, मुंबई
२) मोने, मोरेश्वर सखाराम, 'मराठी साहित्य व व्याकरण', चित्रशाळा प्रकाशन, पुणे, आवृत्ती दहावी
३) जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश, खंड १७', प्रकाशक : महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती, मुंबई
४) विकिपिडिया - श्री शिवछत्रपती
५) कुलकर्णी, श्री. रं. 'मध्ययुगीन मराठी साहित्य : एक पुनर्विचार' राजहंस प्रकाशन, प्रथम आवृत्ती


◆◆◆◆◆